# केल्याने होते आहे रे, आधि केलेचि पाहिजे!



# काळ, काम व वेग याचं जुनं गणित पूर्णपणे उधळून लावून तहानलेल्या जीवांचे आशिर्वाद मिळविण्याचं नवं माणुसकीचं गणित!



# भारतात 'शहरी-विभागात' प्रथमच कार्यान्वित केलेली ५०० एम.एम. व्यासाची जैन पी. व्ही. सी. पाईपांची ७ किलोमीटर्सची विक्रमी जलवाहिनी फक्त ४५ दिवसात सुरु!

### पाणी... पाणी... पाणी...

उद्योगपुरी, पाईपनगरी अशी कौतुकांची बिरुदावली मिरवणा-या जळगाव शहराची भरभराट, त्याच बरोबर अनंत प्रश्न उभे करीत राहिली, ३ लाखांवर लोकसंख्या गेली. औद्योगिक तसंच घरगुती वापरासाठीही पाणी जास्त लागू लागलं, पाण्यासाठी खान्देशच्या दाही दिशा धुंडाळण्याची वेळ आली. आठवड्यातून फक्त दोनदाच पाणी मिळू लागण्यानं नागरिकांच्या डोळ्यातून गंगा-यमुना वाहू लागल्या.

जिथं तिथं एकच विषय... पाणी, पाणी, पाणी!



बीड, लोखंडी किंवा सिमेंट प्रेशर पाईपांच्या पर्यायी योजना तपासल्या गेल्या. खरं तर त्याच्या निविदाही निघाल्या परंतू ठरलेल्या कालावधीत निर्धारीत भांडवल गुंतवणुकीत यापैकी कोणतीच पाईपलाईन बसू शकली नाही म्हणून नगरपालिका वळली जैन पाईपकडे. "घरकी मुर्गी दाल बराबर" असे म्हणतात ते खरेच.

### म्हणून ही पाणी योजना.....

जळगाव एम्.आय्.डी.सी. च्या जलकुंभात तापीचं पाणी येतं. या पाण्याच्या साठ्यातून काही पाणी जळगाव शहराला मिळू शकत होतं.

२००१ सालचा या उन्हाळासाठी हे पाणी मिळवणं, आणणं जरुरी होतं. दररोज सुमारे २० दशलक्ष लीटर्स एवढं पाणी आठवड्यातून दोनदा तरी मिळू शकत होतं. एमआयडीसीचा जलकुंभ ते गिरणा टाकी हे अंतर उणंपुरं ७ किलोमीटर्स् होतं. अत्यल्प वेळात कोण उचलेल हा विडा?

### योजनेचा आवाका.....

५०० एम्.एम्.व्यासांचे जैन पीव्हीसीचे पाईप ३ फूट ६ इंच रुंदीच्या व ६ फूट खोलीचे खड्ड्यात उतरवून जलवाहिनी ७ कि.मी. जोडायची होती.

मार्ग शेतातून, रस्त्यांमधून, नाल्यांमधून, खडकातून, घरादारावरून, गल्ली-बोळातून चढांवरुन-उतारांवरुन जाणारा होता. अवाढव्य आकारांचे पीव्हीसी पाइप्स् बनविणे, त्यांची वाहतूक करणे, ते खड्ड्यात उतरविणे, जोडणे व शेवटी एक थेंबही पाणी न गळता जलवाहिनी चालू करणे हे सर्व ४५ दिवसांत कार्यवाही करणे!





जैन पाईप ™

**दुष्काळाची टाळण्या आपत्ती, काटेकोरपणे वापरा जलसंपत्ती!**

# कुशल तंत्रज्ञ अन आधुनिक यंत्रसामुग्री यांच्या जोडीला काळ, काम व वेगाचे तंत्र...

### अशी ही यंत्रसामुग्री.....

कामाचा प्रचंड आवाका व अत्यंत तोडका वेळ पाहता या कामाचे नियोजन व आराखडा पूर्णपणे संगणकांच्या सहाय्याने करण्यात आला. हे काम एकाचवेळी ४ ठिकाणी सुरु करण्यात आले व त्यासाठी २ पोकलेन यंत्रे, २ एस्कव्हेटर्स, १२ डंपर्स् व २ ट्रॅक्टर्स्, समन्वय साधण्यासाठी २ जीप्स् व २ टेम्पो, २ बसेस ६ मोबाईल फोन्स व वायरलेस सेट वापरण्यात आले, १ वैद्यकीय व्यवस्थेसाठी इमरजन्सी व्हॅन सज्ज  होती. ४० फुटांचा स्पेशल ट्रेलर होता पाईप वाहतुकीसाठी!



### अशी ही मनुष्यशक्ती.....

माणसांचे हात सर्वात महत्वाचे! हे ओळखून ही फौजेची जमवाजमव...

सीनियर व ज्युनियर इंजिनीयर्स्, फिटर्स्, प्लंबर्स् असे कुशल तंत्रज्ञ सुमारे २५. याखेरीज कामगार सुमारे १५० ते २५० त्याखेरीज  ड्रायव्हर्स्, आयत्या वेळचे कामगार वेगळे. शिवाय काम अहोरात्र चालणारे म्हणून मग प्रखर प्रकाशझोतांची कायम व्यवस्था म्हणून इलेक्ट्रीशियनस्, वायरमन्स् सिक्युरीटी तसेच साईटवरच खान-पानाची व्यवस्था ती वेगळीच!



### हार आणि प्रहार.....

भर उन्हाळ्यात पाणी आणणा-या जैन उद्योग समुहाच्या सहका-यांना 'भगीरथ मानून' त्याचे कौतुक असंख्य नागरीक करीत होते.

खड्डे खणतांना केबल्स्, वायर तुटल्यानं चिडचिडलेले, पाण्याच्या पाईपलाईन्स् फुटल्यानं क्रोधावलेलेही तेच !

दोन्ही प्रकारचे नागरिक आपलेच! दोघांचेही मनःपूर्वक आभार!

### धन्य हो......

अशी ही आव्हानात्मक योजना पूर्ण करण्यासाठी ब-याच जणांचे मौलिक सहकार्य लाभले. मा.आ.श्री. सुरेशदादा जैन यांनी दूरदृष्टीने ही योजना आखली व तिचे अमंलबजावणीसाठी कंबर कसली. पालकमंत्री ना.श्री. लक्ष्मणराव ढोबळे, मा.ना.श्री. आर.आर. पाटील, ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सर्व शासकीय परवानग्या विद्युतवेगानं दिल्या व लालफितीचा वासही तिकडं फिरकू दिला नाही. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, सार्वजनिक बांधकाम खाते, आकाशवाणी, भारत संचार निगम यांचेही स्नेहाचे, मदतीचे हात या जगन्नाथाचे रथास लागले.



जैन पाईप™

**पाणी हेच निर्मळ, वाहून नेते अमंगळ!**

# तांत्रिक ठळक मुद्दे!

**खान्देशातील रखरखीत ऊन्हाळा व ४५°से.पर्यंतचे तापमान डोक्यावर घेऊन विक्रमी वेळात युद्ध पातळीवर पूर्ण केलेल्या जळगाव नगरपालिकेच्या या पाईपलाइन प्रकल्पाचे काम कसे पूर्ण झाले त्याची आकडेवारी...**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कामाचे स्वरुप | : | जळगांव शहर पाणी पुरवठासाठी एमआयडीसी, जळगांव ते गिरणा टाकी जळगांव पर्यंत पीव्हीसी पाईप लाईन (गुरूत्ववाहीनी) टाकणे. |
| २) | लांबी | : | ७२७० मीटर |
| ३) | डिस्चार्ज | : | २३२ एलपीएस |
| ४) | व्यास | : | ५०० मि.मी. (बाहेरील), ४७५.४ मि.मी (आतील) |
| ५) | प्रेशर रेटींग | : | ६ कि.ग्रॅ./सेंमी$^2$ टेस्ट प्रेशर लांबी - ६११० मीटर;<br>९ कि.ग्रॅ./सेंमी$^2$ टेस्ट प्रेशर लांबी - ११६० मीटर |
| ६) | उगमस्थानी पाण्याची किमान पातळी | : | १०० मीटर |
| ७) | साठवण टाकीची कमाल पातळी | : | ७६.७५ मीटर |
| ८) | पाण्याचा हेड | : | २३.२५ मीटर |
| ९) | पाईप लाईनमधील फ्रिक्शन लॉस | : | १९.६४ मीटर |
| १०) | रेसिड्युअल हेड | : | ३.६१ मीटर |
| ११) | चारीची मापे | : | १.२ मीटर रूंद, १.८ मीटर खोल. |
| १२) | जोडणीची पद्धत | : | सॉल्व्हंट सिमेंट जॉईंटींग. |
| १३) | एक्सपांशन जॉईन्ट | : | १५ |
| १४) | एअर रिलीज व्हॉल | : | १३ नग ४ इंच साईज (डबल ॲक्शन कायनेटीक टाईप) |
| १५) | स्लूईस व्हॉल्व | : | २ (५०० मि.मी.) |
| १६) | ड्रेन व्हॉल्व | : | २ (२०० मि.मी.) |
| १७) | वॉटर मीटर | : | १ |
| १८) | थर्स्ट ब्लॉक्स | : | ८ |
| १९) | एकूण नाला व रस्ता क्रॉसींग | : | १० |
| २०) | काम सुरू झाल्याची तारीख | : | २५ फेब्रुवारी २००१ |
| २१) | पाणी सुरू झाल्याची तारीख | : | ११ एप्रिल २००१. |
| २२) | टेस्टींग दिल्याची तारीख | : | १६ एप्रिल २००१. |

सविस्तर माहिती हवी असल्यास संपर्क साधा.

जैन पाईप™

पाणी वाचवा देश वाचवा

# एकविसाव्या शतकात कशा पद्धतीनं कामं करावीत यासाठी मार्गदर्शन...

## 'टर्न की' तत्वावर काम द्या....

एकाच कामाचे दहा तुकडे पाडून प्रत्येकाशी वेगळं झुंजण्याचे दिवस सरलेत. आतां आहेत दिवस 'टर्न की' तत्वावर काम करून घेण्याचे. संपूर्ण काम एका व फक्त एकाच छपराखाली. बारिक-सारिक कटकटी नाही. अशी कामं स्वीकारणंही येरागबाळ्याचं काम नाही. त्याला हवा प्रथम आर्थिक भक्कम पाया नंतर हवं व्यवस्थापन कौशल्य. जैन इरिगेशनला अशा रितीनं 'टर्न की' तत्वावर काम करण्याचा भक्कम अनुभव पाठिशी आहे. संपूर्ण भारतात तर नव्हेच पण विदेशांतही अशी कामं जबाबदारीनं पूर्ण केल्याचा लौकिक आहे त्यांचा.

## आराखडा व तंत्रज्ञान....

जैन इरिगेशनला मोठ्या कामांची सुरूवात संशोधन व चाचण्याचे स्वरूपात करायला आवडते. हाती घेतलेल्या कामाचा अभ्यास शास्त्रशुद्ध रितीनं करणं, तशा प्रकारच्या कामांची पूर्वपिठीका पाहणं, प्रयोग करून, चाचण्या करून अनुमानांना पुष्टी मिळवणं सुरू राहतं. या ज्ञानाचे शिदोरीवर आराखडा तयार केला जातो. त्याचे वेळापत्रक बनते. खर्चाचे अंदाज घट्ट होतात. आपत्कालीन समस्यांचा व त्यावरील उपाययोजनांचा नियोजन व अभ्यास होतो, तयारी होते. हे सगळं आखीव, रेखीव शिस्तीत पार पाडण्यासाठी संगणके, तज्ज्ञ व अनुभवी, प्रशिक्षित तंत्रज्ञांची फौजच तयार असते.

## मालाचा अखंड पुरवठा

संपूर्ण योजनेचं यश तिच्यासाठी लागणारे सामान, माल, वेळच्या वेळी जागेवर पोचविण्यात असतं. मालाची गुणवत्ता साहजिकच योजनेच्या गुणवत्तेत प्रतिबिंबीत होत असते. जैन इरिगेशन आज पॉलिमर प्रक्रिया उद्योगात देशात आघाडीवर असल्याने अशा योजनांना लागणारे विविध प्रकारचे पाईप्स, फिटींग्ज आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय मानकांसह अतीउच्च गुणवत्ता राखून वेळेवर देणं त्यांना सहज जमतं. म्हणूनच भारतातील एकमेव आयएसओ ९००१ कंपनी असा नावलैकीक मिळाला हीच तर त्यांची खरी ताकद आहे.

## कामाची गुणवत्ता व वेग

जैन इरिगेशनकडं अशा प्रकारच्या महाकाय योजनांसाठी मशीन्स आहेत. अजस्त्र क्रेन्स, पोकलेन, एस्कॅव्हेटर्स, रोड रोलर्स, डंपर्स या इतर साधनांचा ताफा आहे. अशी यंत्रं चालविणारे कुशल हात आहेत. त्यांची वजवणूक, दुरूस्ती करणारे तंत्रज्ञहि आहेत. यांचा सगळ्यांचा मेळ घालून कामाचा वेग वाढवणारे नियोजन व व्यवस्थापन आहे. हे सगळं सांभाळतांना क्षणभरही गुणवत्तेकडं दुर्लक्ष होणार नाहीं हे डोळ्यात तेल घालून पाहणारी नजरही आहे.

## लिहा तुम्हीच तुमची यशोगाथा....

अशा कामांसाठी 'जैन इरिगेशनची' निवड केलीत कीं तुमची यशोगाथा तुम्हीच लिहिलीत म्हणून समजा. कारण भक्कम शक्तीच्या खांद्यावर तुम्ही तुमची मान टेकवलीत यातच सर्व काही आलं.

**नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामीण व शहरी पाणीपुरवठा योजना, उपसा जलसिंचन योजना, पाटबंधारे योजना, औद्योगिक महामंडळं, प्राधिकरणे, सहकारी कारखाने, खाजगी उद्योगधंदे, शेती व फार्म हाऊसेस इत्यादींसाठी नेत्रदीपक आणि पथदर्शी यशोगाथा!**



जैन पाईप ™

झालंच तर तिसरं महायुद्ध पाण्यासाठी होईल!

# वापर नक्की कसा करणार हे सांगितलंत तर आम्ही त्यासाठी योग्य पाईप कोणता ते लगेच सांगू !

पिण्याचे पाणी, शेतीचे पाणी, गटारांचे पाणी, घाण पाणी, मैला, विविध रसायने, मळी, विविध वायू, विविध प्रकारच्या वायर्स व केबल्स यांच्या वाहतुकीसाठी, वाटपासाठी, संरक्षणासाठी, विल्हेवाटीसाठी वा उचलीसाठी थोडक्यात काय तर अनंत प्रकारच्या कामांसाठी हजर आहेत 'जैन पाईप'!



**पीव्हीसी प्रेशर पाईप्स** - उच्च दाबाने पाणी खेचण्यासाठी, शेतीसाठी, गावातील पाणी पुरवठ्यासाठी उपसा जलसिंचनासाठी.

**सक्शन आणि डिलीव्हरी पाईप्स** - विहीरीवरील पंपाला जोडण्यासाठी.

**वेल केसिंग आणि स्क्रीन पाईप्स** - ट्यूब वेल आणि बोअरवेलसाठी.

**प्लंबिंग पाईप्स** - घरगुती वापरातील पिण्याच्या पाण्याच्या नळांसाठी.

**स्युअर आणि ड्रेनेज पाईप्स** - गटारी, घाणी, मैला वाहतुकीसाठी पाईप्स

**एस.डब्ल्यू.आर सॉइलवेस्ट रेन वॉटर पाइप्स** - इमारतीमधून पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी पाईप्स

**पीव्हीसी रायझर पाईप्स** - हातपंपासाठी तसेच कृषी पंपासाठी.

**एचडीपीई स्प्रिंकलर्स पाईप्स** - तुषार सिंचनासाठी जमिनीच्या पृष्ठभागावर अंथरून वापराचे पाईप्स सहजतेने हलविता येणारे.

**कॉलम/रायझर एचडीपीई पाईप्स** - कूपनलिका-नलिका विहिरींसाठी कमी जोड देऊन वापरासाठी पाईप्स. हातपंपासाठी पाईप्स.

**एचडीपीई प्रेशर पाईप्स** - उच्च दाबाने पाणी, मैला, रसायने वहनासाठी पाईप्स.

**केबल डक्ट पाईप्स** - विजेच्या, टेलिफोनच्या केबल्सच्या संरक्षणासाठी.

**रिब्लॉक पाईप्स** - दाबविरहित वापरासाठी. अखंड आणि जोडविरहित काम.

**स्प्रे पाईप्स** - उच्च दाबाने विषारी रसायनांची फवारणी करण्यासाठी पाईप्स.

**ओएफसी ऑप्टीकल फायबर केबल डक्ट पाईप्स** - दळणवळणाच्या संदेश प्रक्षेपणासाठी वापरायच्या केबल्सना संरक्षण देणारे पाईप्स

**एमडीपीई गॅस ॲंड वॉटर पाईप्स** - वायू तसंच पाण्याच्या वाहतुकीसाठी खास पाईप्स.

**एचडीपीई लॅंड फिल पाईप्स** - जमिनीच्या पोटातून गॅस/वायू काढण्यासाठी पाईप्स.

**पाईप फिटींग्ज्** - २० मि.मि. ते ५६० मि.मि. पर्यंतच्या सर्व पी.व्ही.सी. व पॉलिइथेलीन पाईपसाठी लागणा-या जैन फिटींग्ज्.



जैन पाईप™

गरज नवी तसा पाईप नवा सर्वांनाच जैन पाईप हवा

# एकदा का सूक्ष्म सिंचन पद्धत तुम्ही स्वीकारायचं ठरवलंत की तुम्हाला भरपूर पर्याय आम्ही देऊ...

## पाणी नियोजनात नवतंत्र राबवा!

भारतात सर्वात जास्त अनुभव गाठीस असलेली, ४० पिकांवर आज चालू असलेली व ७ लाख एकरांवर कार्यरत असलेली एकमेव ठिबक सिंचन प्रणाली 'जैन ठिबक'!

**आधुनिक सिंचन व शेतीकरिता उच्चतंत्रज्ञानाची ही पहा आमची उत्पादन मालिका!**

**जे- टर्बोलाईन (ड्रिपर लाईन)** - उत्पादन करते वेळीच जे-टर्बोलाईनचे ड्रिपर्स ठराविक अंतरावर नळीच्या आत बसविले जातात. ही जमिनीवरून अथवा जमिनीखालून दोन्ही प्रकारे वापरता येते. जे-टर्बोलाईन प्रेशर कॉम्पेन्सेटींग प्रकारातही उपलब्ध आहे. जे-टर्बोलाईन १२ व १६ मि.मि. व्यासात उपलब्ध.

**फिल्टर्स - हायड्रोसायक्लॉन, सॅण्ड व स्क्रिन** एकत्र असे लहान-मोठे, उभे-आडवे, अर्ध वा पूर्ण स्वयंचलित, धातूचे वा प्लॅस्टिकचे असे पाणी गाळण्याचे विविध फिल्टर्स.

**स्प्रिंकलर्स व रेनगन** - प्लास्टिक व धातुची निरनिराळ्या क्षमतेच्या मजबुत धाटणीचे स्प्रिंकलर्स सोबतच विशाल सेवांसाठी वापरात येणा-या उच्चदाबावर चालणा-या रेनगन्स्‌ही उपलब्ध.

**पॉप अप्स** - जमिनीवर उभं राहून विविक्षित व्यासात तुषार सिंचन करणारे तसंच कामे संपल्यावर जमिनीच्या पोटात जाणारे स्प्रिंकलर्स.

**व्हॉल्व्हज्** - पाईपलाइनमधील पाणी, दाब, प्रवाह, हवा, यांवर त्वरित व उत्तम तसेंच परिणामकारक नियंत्रण राखण्यासाठी पूर्णपणे पीव्हीसी/नायलॉन/ एबीएस चे लहान मोठे व्हॉल्व्हज.



**पॉलीट्यूब्ज व होजेस** - अंगभूत पिवळी पट्टी असणा-या विविध व्यासांच्या व विविध जाडींच्या नळ्या व पाईप्स.

**ड्रिपर्स / एमीटर्स** - उघडून धुवून स्वच्छ करता येण्याजोगे, कधीही उघडता न येणारे, ठिबक नळीला बाहेरून लावायचे, बसवलेले, बाह्य रंगांवरून पाणी उत्सर्जनाचा दर कळणारे, रंगीबेरंगी, प्रेशर कॉम्पेन्सेटींग, टर्ब्युलन्ट व लॅमिनार फ्लो असे विविध ड्रिपर्स.

**स्प्रे हेडस्‌ व जेटस्‌** - जास्त पाण्याची गरज भागविण्यासाठी सूक्ष्म नळीला, साध्या नळीला खोचून जोडता येण्याजोगे छोटेखानी तुषार सिंचन करणारे स्प्रिंकलर्स, अगदी बारीक फवारा उडवून पाण्याचं धुके निर्माण करणारे फॉगर्स.

**स्वयंचलित साधने** - शेतीला पाणी-खते देण्याच्या वेळा, त्यांच्या मात्रा, दिशा, निवड, वेग इत्यादी गोष्टींचे स्वल्प, अर्ध वा पूर्ण नियंत्रण करणा-या विविध उपकरणांच्या मालिका संगणक संचालित वा साधा. हवा तसा.

**खत-प्रदान यंत्रणा** - पाण्याबरोबर खतांच्या लहान-मोठ्या, वेळापत्रकानुसार मात्रा देण्याच्या विविध यंत्रणा.

**जमीन कशीही असो, पीक कोणतेही असो, खतं कसलीही असोत पाणीहि कसंही असो आणि तुमचं बजेट कसंही असो थेट आमच्याकडं या. तुमच्या गरजांना फिट्ट बसणारं उत्तर आम्ही देऊच देऊ वर ते तुम्हाला पुरवू. चालवून दाखवू!**

## थेंब थेंब पाणी, जीवनात चैतन्य आणी!

## पाणी निम्म्यानं उत्पादन दुपटीनं करामत करा जैन ठिबकनं!

जैन प्लास्टिक पार्क, बांभोरी, पो. बॉ. ७२, जळगाव - ४२५ ००१., दूरध्वनी: ०२५७-२२५००११/२२, फॅक्स: ०२५७-२२५११११/२२.
ई-मेल: jisl@jains.com, इंटरनेट: www.jains.com